(5)

त.अ. ४त

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** बदनापूर **Year (वर्ष):** 2020
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0468 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/12/2020 18:13 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** रविवार **Date From (दिनांक पासून):** 13/12/2020
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/12/2020
**Time From (वेळेपासून):** 11:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/12/2020 **Time (वेळ):** 18:02 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 020 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/12/2020 18:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 25 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिवाजी विद्यालय दाभाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** विलास रामचंद्र इंगळे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1963 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद, दाभाडी,बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद, दाभाडी,बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (... |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. बबन दाजीबा झोटे | | | 1. मुख्याध्यापक, शिवाजी वि... कनिष्ठ महाविद्यालय, दाभ... बदनापूर,जालना,महाराष्ट्र... |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून ... करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(... (मुल्य (... |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,080/ रुपये लाचेची रक्कम या लागलेली . | |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 1,080.00

11 Inquest Report / U.D. case No., If any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

जालना. दिनांक 13.12.2020.मी विलास रामचंद्र इंगळे, वय 57 व...
व्यवसाय नोकरी सहशिक्षक, शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय दाभाडी, ता बदनापुर जि जालना रा. C/O पंचम रेसीडेन्सीच...
उषाकुंज प्लट क्र 7, राठी संसारजवळ विसादेवी रोड, औरंगाबाद मो नं. 9422218983, 9764902625.समक्ष हजर राहुन फिर्याद...
की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहतो व दि. 19.07.1984 पासुन शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय दाभाडी, ता. बद...
जि. जालना येथे जेष्ठ सहशिक्षक म्हणुन सतत सेवेत नोकरी करतो. आमच्या विद्यालयात श्री. बी. डी. झोटे हे मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत
आहेत. आमच्या शाळेतील माझे व इतर शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक यांचे पगार बील, वैदयकीय बील, GPF (अग्रीम ना परतावा) बील व इतर
ऑनलाईनकाम हे मुख्याध्यापक यांचे स्वाक्षरीने पुढील मंजुरीसाठी माध्यमिक शिक्षण विभाग जि.प. पे युनिट,जालना यांना प्रस्ताव सादर क...
जातात व त्यानंतर आम्हास बिल मंजुर होते. मी माझे औरंगाबाद येथील घराचे बांधकाम दुरुस्तीचे काम चालु केले असुन त्या कामासाठी
माझ्याकडे पैसे कमी पडल्याने मी माझे GPF फंडातील जमा रक्कम अग्रीम नापरतावा मिळण्यासाठी दि. 08.12.2020 रोजी अर्ज आमचे
मुख्याध्यापक श्री बी डी झोटे यांचेकडे दिला, तेव्हा त्यांनी, मला तुमच्या बीलाचा प्रस्ताव तयार करुन पुढील मंजुरीसाठी पाठवण्याचे 1080
ऐवढ पैसे दयावे लागतील असे सांगीतले, तेव्हा मी त्याना पैसे कशाला दयावे लागतील, असे म्हणालो असता त्यांनी प्रस्ताव तयार करुन
देण्यासाठी पैसे दयावेच लागतील नाही दिले तर तुमच्या लेखी ऑफ लाईन जो प्रस्ताव तयार केला आहे त्यावर मी सहया करणार नाही असे
सांगीतले. मला घराचे बांधकाम दुरुस्ती करणसाठी पैशाची अत्यंत आवश्यकता असल्याने मी त्यांना 1080 रुपये देण्यासाठी होकार देवुन
माझा GPF मिळणेबाबतचा प्रस्ताव (अग्रीम ना परतावा) तसेच इतर पगारासंबंधीचे ऑनलाईन कामे करण्याची विनंती केली. मला आमचे श्री
मुख्याध्यापक श्री बी डी झोटे हे माझा GPF मिळणे बाबतचा प्रस्ताव (अग्रीम ना परतावा) आणि मागील बिलासबंधीचे केलेले ऑनलाईन का...
तसेच इथुन पुढच बिलासंबंधीचे ऑनलाईन कामे करण्यासाठी जी लाच मागत आहे. त्यांना ती लाच दयायची माझी इच्छा नाही, परंतु जर त्यांना
लाच दिली नाही, तर ते माझा GPF मिळणेबाबतचा प्रस्ताव (अग्रीम ना परतावा) यावर सही करुन तो पाठवणार नाहीत आणि पैसे मिळाले
नाहितर माझे घराचे दुरुस्तीचे बांधकाम होणार नाही. आमचे शाळेचे मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मनी नाही, ...
देण्या घेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. मुख्याध्यापक श्री बी डी झोटे हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्...
मला माहित आहे. मी आज दिनांक 12.12.2020 रोजी शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, दाभाडी, ता.बदनापुर जि.
जालना येथे त्यांना भेटण्यासाठी जाणार असुन तेथे त्यांना माझा GPF अग्रीम ना परतावा मिळणेबाबतच्या प्रस्तावावर सही करुन मंजुरीसाठी...



Scanned with CamScanner

लवकर पाठवण्याची आणि मागील बिलासंबंधीचे केलेले ऑनलाईन कामे तसेच इथुन पुढचे बिलासंबंधीचे ऑनलाईन कामे करण्यासाठी विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करून ते स्वत: किंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांना पकडुन कार्यवाही करावी. वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.        दि.12.12.2020 रोजी माझ्या तक्रारी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब यांनी मला दोन पंच व सापळा पथक यांच्यासोबत ओळख करून देवुन, आमचे शाळेचे मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांची पंचासमक्ष प्रत्यक्ष भेट घेवून व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने शाळेचे मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पंच क्र.1 श्री. शेख अखील शेख युनुस यांचेसह माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करून देवून शिवाजी विदयालय, व कनिष्ठ महाविदयालय दाभाडी, ता बदनापुर जि जालना येथे त्यांना भेटण्यासाठी पाठविले असता तेथे त्यांची भेट  झाली. सदर भेटीमध्ये मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यानी माझ्याकडे माझा GPF अग्रीम ना परतावा मिळणेबाबतच्या प्रस्तावावर सही करुन मंजुरीसाठी लवकर पाठवण्याची आणि मागील बिलासंबंधीचे केलेले ऑनलाईन कामे तसेच इथुन पुढचे बिलासंबंधीचे ऑनलाईन कामे करण्यासाठी मला 1,080/- रु. दयावे लागेल असे पंचासमक्ष 1,080/-रुपयाची लाचेची मागणी करुन 1,080/-रुपये स्वीकारण्यास तयार असल्याचे निष्पन्न झाले.त्यावरुन आज दि. 13.12.2020 रोजी शिवाजी विदयालय व कनिष्ठ महाविदयालय दाभाडी, ता बदनापुर जि जालना येथील मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांचे कार्यालयात त्यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरवुन दाभाडी, ता.बदनापुर जि.जालना येथे शेत शिवारात सुरक्षीत ठिकाणी मला व पंचांना अल्ट्राव्हाईलेट लम्प व अंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याबाबत माहीती देवुन त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. मी हजर केलेले 1,080/-रूपये मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांना लाच म्हणुन देण्यासाठी काढून त्या नोटांना अंन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या शर्टच्या वरील डाव्याबाजुच्या खिशात ठेवले. मला व दोन्ही पंचाना सुचना दिल्या.त्यानंतर मला व पंच श्री. शेख अकील शेख युनुस यांना शिवाजी विदयालय, व कनिष्ठ महाविदयालय दाभाडी, ता बदनापुर जि जालना येथे मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांचे कार्यालयात त्यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले व त्या ठिकाणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना कार्यालयातील कर्मचारी यांचेसह सापळा लावण्यात आला. सापळ्याचे वेळी मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांनी त्यांचे कार्यालयात 11.25 वाजे दरम्यान सदर शाळेच्या संस्थेच्या संचालक मंडळाची बैठक चालु असतांना पंच साक्षीदार श्री. शेख अकील शेख युनुस यांचे समक्ष माझ्याकडून माझा GPF अग्रीम ना परतावा मिळणेबाबतच्या प्रस्ताव मंजुरीसाठी लवकर पाठवण्याची आणि मागील बिलासंबंधीचे केलेले ऑनलाईन कामे तसेच इथुन पुढचे बिलासंबंधीचे ऑनलाईन कामे करण्यासाठी 1,080/- रुपयाची लाच स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला असता पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब व स्टफ तसेच पंच नं.2.श्री. जी.एन.पन्नम असे लगेच त्याठिकाणी येवुन,पंच क्र.1. श्री. शेख अकील शेख युनुस यांच्याकडे लाचेच्या रकमेबाबत व मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांचेबाबत माहीती विचारुन मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांना सापळा पथकाने पकडले. व माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला. पोलीस निरीक्षक श्री.ताटे साहेब यांनी मुख्याध्यापक श्री. बी. डी. झोटे यांना स्वतःची व सापळा पथकाची ओळख करून देवुन त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. बबन दाजीबा झोटे, वय 56 वर्ष व्यवसाय नोकरी मुख्याध्यापक, शिवाजी विदयालय व कनिष्ठ महाविदयालय, दाभाडी, ता.बदनापुर जि. जालना रा. शिक्षक कलनी, दाभाडी, ता बदनापुर जि जालना रा.111/16 ई सेक्टर, शिवाजी नगर औरंगाबाद असे सांगीतले. त्यानंतर मला त्यांचे कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर थोडया वेळाने मला मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे यांचे कार्यालयात बोलावुन दार खिडक्या बंद करुन अल्ट्राव्हाईलेट लम्पच्या प्रकाश झोत माझ्या कपडयावर व हातावर टाकुन निरीक्षण केले असता माझे उजव्या हातावर व शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशाचे तोंडावर व आतील बाजुस न्थ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर मी, पोलीस निरीक्षक श्री. ताटे साहेब, सापळा पथक, दोन्ही पंच, मुख्याध्यापक श्री बी. डी. झोटे असे तेथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी आज दिनांक 13.12.2020 रोजी 11.25 वाजेचे दरम्यान शिवाजी विदयालय, व कनिष्ठ महाविदयालय दाभाडी, ता बदनापुर जि जालना याशाळेचे मुख्याध्यापक श्री. बबन दाजीबा झोटे यांनी  माझा GPF अग्रीम नापरतावा मिळणेबाबतच्या प्रस्तावावर सही करुन मंजुरीसाठी लवकर पाठवण्यासाठी आणि मागील बिलासंबंधीचे केलेले ऑनलाईन कामे तसेच इथुन पुढचे बिलासंबंधीचे ऑनलाईन कामे करण्यासाठी पंच साक्षीदार श्री. शेख अकील शेख युनुस यांचेसमक्ष 1,080/- रु लाचेची मागणी करुन माझ्याकडुन 1,080/-रुपयांची लाच  शिवाजी विदयालय, व कनिष्ठ महाविदयालय दाभाडी, ता बदनापुर जि जालना येथे त्यांचे मुख्याध्यापक कार्यालयात स्विकारली असतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली सही

विलास रामचंद्र इंगळे

**13.Action**   **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ~~RAVINDRA DEVIDAS NIKALJE~~ PI/ एस.एस.ताटे.

**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): PI   **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned with CamScanner

N.C.R.B

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखवि नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

एन. एन. उबाळे

सहायक पोलीस निरीक्षक

पोलीस ठाणे, वदनापूर

**Signature of Officer in charge, Station** (ठाणे प्रभारी अ

**Name** (नाव): Maruti Bhimsen K

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 1460100450MBKM79

Scanned with CamScanner